**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**सुचना क्र. १/२०११**

**' पर्यावरण पुरस्कार - २०११ '**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे परिक्षेत्रातील संलग्नीत महाविद्यालय, संस्था, स्वायत्त संस्था व व्यक्तीगत गटामधून ज्यांनी वृक्षारोपन, वृक्षसंवर्धन, जलव्यवस्थापन, जलसंवर्धन व पर्यावरण संवर्धन इत्यादी क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केलेले असेल त्यांचेकडून **' पर्यावरण पुरस्कार - २०११ '** करिता नामांकन अर्ज मागविण्यात येत आहे. नामांकन अर्ज भरण्याची शेवटची तिथी **दि. ३१ ऑगष्ट २०११** आहे. सदर पुरस्कारासंबंधीची माहिती व कार्यपध्दती आणि अर्जाचा नमुना (संस्था संवर्ग व वैयक्तीक गट) विद्यापीठाच्या उद्यान विभागात विना मुल्य मिळेल व **www.sgbau.ac.in** या संकेत स्थळावरून प्राप्त करता येईल.

कुलसचिव

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**परिशिष्ट-१**

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**' पर्यावरण पुरस्कार-२०११ '** **प्रपत्र-अ**

**प्रस्तावना :-**

वृक्षारोपन, वृक्षसंवर्धन, जलव्यवस्थापन, जलसंवर्धन या संदर्भात जी संलग्नित महाविद्यालये, संस्था, स्वायत्त संस्था उत्कृष्ट कार्य करतील अशा महाविद्यालयांना, संस्थांना, स्वायत्त संस्थांना व व्यक्ती यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे **' पर्यावरण पुरस्कार '** देण्यात येईल. यासाठी दरवर्षी **दि.२ डिसेंबर ' राष्ट्रीय प्रदुषण दिनी '** उत्कृष्ठ कार्य करणा-या महाविद्यालये, संस्था, स्वायत्त संस्था व व्यक्ती यांच्यापैकी निवड झालेल्या प्रत्येकी एक संस्था व व्यक्ती यांना विद्यापीठाचे स्मृतीचिन्ह, प्रशस्तीपत्र, रोख बक्षिस देवून गौरविण्यात येईल.

**उद्देश**

विद्यापीठाचे संलग्नित महाविद्यालये, संस्था, स्वायत्त संस्था, विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी, अधिकारी यांचेमध्ये पर्यावरणासंबंधी वृक्षारोपन, वृक्षसंवर्धन, जलव्यवस्थापन, जलसंवर्धन याबाबत आस्था निर्माण करण्यासाठी तथा या कार्यामध्ये स्पर्धा निर्माण व्हावी आणि चांगल्या कार्याला प्रोत्साहन मिळून त्यांचा गौरव व्हावा, या उद्देशाने पारितोषिक सुरू करण्यात येत आहे.

**निम्नतम योग्यता**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अंतर्गत येणा-या सर्व जिल्ह्यातील जी संलग्नित महाविद्यालये, संस्था, स्वायत्त संस्था कमीत कमी ५ वर्षे पर्यावरणासंबंधी वृक्षारोपन आणि वृक्षसंवर्धन, जलव्यवस्थापन, जलसंवर्धन या क्षेत्रात कार्य करित असतील त्यांना या पुरस्कारासाठी पात्र समजण्यात येईल.

**पुरस्कार योग्य संवर्ग**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अंतर्गत येणा-या सर्व जिल्ह्यातील संलग्नित महाविद्यालये, संस्था, स्वायत्त संस्था यामधून एक व व्यक्ती या संवर्गातून एक यांचा या पुरस्कारासाठी विचार करण्यात येईल.

**पुरस्काराचे स्वरूप**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या अंतर्गत येणा-या सर्व जिल्ह्यातील संलग्नित महाविद्यालये, संस्था, स्वायत्त संस्था व व्यक्ती यांना खालीलप्रमाणे पुरस्कार देण्यात येतील.

१) संस्था गट - रू. १५,०००/- रोख रक्कम, विद्यापीठाचे स्मृतीचिन्ह,प्रशस्तीपत्र.

२) वैयक्तीक गट -रू.१०,०००/- रोख रक्कम, विद्यापीठाचे स्मृतीचिन्ह, प्रशस्तीपत्र.

उपरोक्त पुरस्कार मा.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अथवा मा.कुलगुरूंच्या समकक्ष असलेल्या मान्यवर व्यक्ती किंवा पर्यावरण क्षेत्रातील तज्ञ मान्यवर व्यक्तिंच्या हस्ते समारंभपुर्वक प्रदान करण्यात येतील.

**पुरस्कार निवड समिती :- पुरस्काराचे समितीमध्ये एकूण पाच सदस्य राहतील.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | अध्यक्ष | - | अध्यक्ष | ( व्य.प.ने नामित केलेले ) |
| २) | सदस्य | - | १ सदस्य | ( व्य.प.ने नामित केलेले ) |
| ३) | विषयतज्ञ | - | १ सदस्य | ( व्य.प.ने नामित केलेले ) |
| ४) | मा.कुलसचिव | - | सदस्य | |
| ५) | उद्यान अधिक्षक | - | सदस्य सचिव | |

व्यवस्थापन परिषद एक विषयतज्ञ नामित करतील, व्यवस्थापन परिषदेने नामित केलेले सदस्य, निवड समितीचे सदस्य राहतील.

..२..

**पुरस्काराची कार्यपध्दती**

१) वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, जलव्यवस्थापन, जलसंवर्धन या क्षेत्रात राष्ट्रीय किंवा आंतर राष्ट्रीय स्तरावर पुरस्कार प्राप्त केलेली संलग्नित महाविद्यालये, संस्था, स्वायत्त संस्था व व्यक्ती यांनी ' पर्यावरण पुरस्कारासाठी ' अर्ज करणे अपेक्षित नाही.

२) नामांकन भरण्याची शेवटची तिथी ३१ ऑगष्ट राहील. यासबंधीची जाहीरात विद्यापीठाव्दारे वृत्तपत्रातून प्रकाशित करण्यात येईल व परिपत्रकाव्दारे संबंधीत संस्था, महाविद्यालयांना कळविण्यात येईल.

३) नामांकन अर्ज विहित नमुन्यात सादर करावयाचे असल्याने सदर नामांकन अर्जाच्या प्रती ' संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे ' www.sgbau.ac.in संकेतस्थळावरून प्राप्त करता येतील.

४) ज्या वर्षासाठी नामांकन अर्ज मागविण्यात आलेले आहे. त्याच वर्षी दि.२ डिसेंबर ' राष्ट्रीय प्रदुषण दिनी ' पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

५) निवड समिती, प्राप्त झालेल्या नामांकन पत्राची छाननी करून, वैध नामांकन अर्ज असलेल्या संलग्नित महाविद्यालय,संस्था,स्वायत्त संस्था, संस्था या गटातून व व्यक्ती या गटातून निवड समितीला प्रथमदर्शनी योग्य वाटलेल्या पहिल्या तीन कार्यक्षेत्राला प्रत्यक्ष भेटी देवून, मुल्यमापन करतील.

६) पर्यावरण पुरस्कार समिती आपल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करतील. निवड समितीच्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेला मान्य असल्यास संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त संस्था, संस्था या गटातून एक व व्यक्ती या गटातून एक यांना पुरस्कार प्रदान करण्यात येतील.

७) पर्यावरण पुरस्कारासाठी निवड समितीच्या निकषानुसार एकही महाविद्यालय, अथवा संस्था,स्वायत्त संस्था व व्यक्ती पात्र नसल्यास त्या वर्षीचा पुरस्कार देण्यात येणार नाही/घोषित करण्यात येणार नाही. याबाबत अंतीम अधिकार व्यवस्थापन परिषदेला राहतील.

८) पुरस्काराचे नामांकन अर्ज पांच प्रतीत भरून पाठविणे अनिवार्य राहील.

९) कलर फोटोच्या प्रती प्रस्तावासोबत सादर कराव्या व तसेच इतर सर्व दस्ताऐवजाच्या सत्यप्रती साक्षांकित असणे अनिवार्य राहील.

१०) पर्यावरण पुरस्काराच्या नावातील वर्ष दरवर्षी बदलविण्यात येईल.

११) संस्था गटातून नामांकन भरणा-या संस्था किंवा महाविद्यालयाने राष्ट्रीय सेवा योजनेकडून केलेल्याच कार्याचा केवळ उल्लेख असू नये. तर प्रत्यक्ष संस्था व महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने इतर विद्यार्थी, शिक्षक, पालकांच्या सहकार्याने केलेल्या कार्याचा उल्लेख प्रस्तावात असणे आवश्यक राहील. केवळ राष्ट्रीय सेवा योजनेच्याच कार्यावरून या पुरस्कारासाठी विचार केल्या जाणार नाही. हिच अट वैयक्तिक गटासाठी देखील लागु राहील.

१२) पर्यावरण पुरस्काराबाबतचे नियम व अटी तसेच निर्णयाबाबत अंतिम अधिकार विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेकडे राहतील.

१३) पुरस्कार नामांकन अर्ज ' कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती ' यांचेकडे नोंदणीकृत डाकेव्दारे पाठवावे. विहित नमुन्यात व प्रतीत नामांकन अर्ज प्राप्त न झाल्यास अथवा विहित तिथीपर्यंत विद्यापीठाला प्राप्त न झाल्यास सदर प्रस्तावावर विचार केल्या जाणार नाही.

.

प्रपत्र-ब

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**‘ पर्यावरण पुरस्कार-२०११ ‘**

**नामांकनासाठी अर्जाचा नमुना**
**( संस्था संवर्ग )**

**( अर्जदारास विहीत प्रपत्रातच अर्ज करावयाचा असून तो A-४ साईज पेपरवर संगणकीकृत करावा.)**

१) अर्जदार महाविद्यालय/संस्थेचे नांव, पुर्ण पत्ता व दुरध्वनी क्रमांक :-----------------------------
------------------------------------------------------------------------------------------------

२) प्राचार्य / संस्था प्रमुखाचे नांव, पुर्ण पत्ता व दुरध्वनी क्रमांक :- -------------- --------------
------------------------------------------------------------------------------------------------

३) नोंदणी क्रमांक :- ------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------

४) लागवड करण्यात आलेल्या झाडांची नांवे व संख्या.: (विस्तृत माहिती स्वतंत्र प्रपत्रात द्यावी.)
------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

५) शासकीय / सामुहिक अथवा खाजगी जमिनीवर सरपन/वैरण देणा-या झाडांची लागवड :- ----
------------------------------------------------------------------------------------------------

| ज्या जमिनीवर लागवड केलेली आहे तिची मालकी- | क्षेत्रफळ (हे.) | जागेचे वर्णन (पडीक/खार जमिन/दलदल इ.) |
|---|---|---|
| खाजगी जमिन | | |
| सामुहिक जमिन | | |
| महसुल जमिन | | |

६) वृक्षलागवडीचे कार्यक्रमात ग्रामीण दुर्बल घटकांचा तसेच महिलांचा सहभाग घेतला असल्यास व त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये झालेली सुधारणा :- ------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------

७) पर्यावरण संवर्धनासाठी महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी श्रमदानातून केलेले कार्य/सहभाग- ---
------------------------------------------------------------------------------------------------

८) सामुहिक लागवडीचे कुंपणाविना स्वयंस्फुर्तीने संरक्षण व देखभालीबद्दल केलेल्या कार्याची माहिती :-
------------------------------------------------------------------------------------------------

.९) अपारंपारिक ऊर्जा स्त्रोताचा वापर करण्यासाठी जनतेला प्रोत्साहित करणे व त्याच्या वापरासाठी प्रवृत्त करण्यासाठी केलेल्या कार्याची माहिती सहपत्रासह :- ------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------

१०) वृक्षलागवड, वृक्षसंवर्धन, जलव्यवस्थापन, जलसंवर्धन या संबंधात केलेल्या प्रत्यक्ष कार्याची व जनजागृती / प्रसिध्दी व प्रेरणा याबाबत केलेल्या कार्याची तपशिलवार माहिती :- ------------
------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------------------------------

११) केलेल्या कार्याचा कालावधी, लागवड केलेल्या जीवंत झाडांची टक्केवारी सद्यस्थिती :- -------
------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

| तपशील | २००६ | २००७ | २००८ | २००९ | २०१० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| लागवडीचे क्षेत्र ( हेक्टरमध्ये ) | | | | | | |
| लागवड केलेल्या झाडांची संख्या | | | | | | |
| जीवंत झाडांची संख्या | | | | | | |
| जलव्यवस्थापन/जलसंवर्धन | | | | | | |

१२) केलेल्या कार्याविषयी काही ' व्याख्याने/प्रकाशने/प्रसिध्दी ' झाली असल्यास त्याच्या सत्यप्रती :-
------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

१३) या अथवा अशा कामासाठी पुर्वी काही पारितोषिक, पुरस्कार, प्रशस्तीपत्रक इ. मिळाली असल्यास त्यांचा तपशील :- ------------------------------------------------------------------

१४) इतर माहिती असल्यास :- ---------------------------------------------------------------------

**अर्जदाराची सही व हुद्दा**

## <u>प्रतिज्ञापत्र</u>

प्रतिज्ञापूर्वक सही करतो की, वर नमुद केलेल्या सर्व बाबी माझ्या ज्ञान व माहितीनुसार सत्य आहेत आणि माझ्या स्पष्ट जाणीवेनुसार दिलेल्या आहेत. प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या माहितीचे मुळ दस्ताऐवज तसेच प्रत्यक्ष कार्यक्षेत्राची पाहणी करण्यासंबंधी निवड समितीने मागणी केल्यास त्वरीत उपलब्ध करून देण्याची हमी देतो.

**ठिकाण :-**

**दिनांक :-**

( संस्था प्रमुखांची स्वाक्षरी )

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**(केवळ कार्यालयाकरिता)**

**१) प्रस्ताव अग्रेषित करणा-या निवड समितीचा शेरा / शिफारस.**

प्रपत्र-क

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**' पर्यावरण पुरस्कार-२०११ '**

नामांकनासाठी अर्जाचा नमुना

**( वैयक्तीक गट )**

( अर्जदारास विहीत प्रपत्रातच अर्ज करावयाचा असून तो A-४ साईज पेपरवर संगणकीकृत करावा.)

१) अर्जदाराचे नांव, पुर्ण पत्ता व दुरध्वनी क्रमांक :- ------------------------------------------
- ----------------------------------------------------------------------------------------------

२) लागवड करण्यात आलेल्या झाडांची माहिती व संख्या-(विस्तृत माहिती स्वतंत्र प्रपत्रात द्यावी.)
----------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------

३) शासकीय / सामुहिक अथवा खाजगी जमिनीवर सरपन/वैरण देणा-या झाडांची लागवड :- ----
----------------------------------------------------------------------------------------------

| ज्या जमिनीवर लागवड केलेली आहे तिची मालकी- | क्षेत्रफळ (हे.) | जागेचे वर्णन (पडीक/खार जमिन/दलदल इ.) |
|---|---|---|
| खाजगी जमिन | | |
| सामुहिक जमिन | | |
| महसुल जमिन | | |

४) वृक्षलागवडीचे कार्यक्रमात ग्रामीण दुर्बल घटकांचा तसेच महिलांचा सहभाग व त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये झालेली सुधारणा :- ----------------------------------------------------------
----------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------

५) वृक्ष लागवडीचे श्रमदानातून केलेले कार्य :- ---------------------------------------------
----------------------------------------------------------------------------------------------

६) सामुहिक लागवडीचे कुंपणाविना स्वयंस्फुर्तीने संरक्षण व देखभालीकरिता प्रोत्साहीत केलेल्या कार्याची माहिती :- ----------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------------------------------------

७) अपारंपारिक ऊर्जा स्त्रोताचा वापर करण्यासाठी जनतेला प्रोत्साहीत करणे व त्याच्या वापरासाठी प्रवृत्त करण्यासाठी केलेल्या कार्याची माहिती सहपत्रासह :- ----------------------
----------------------------------------------------------------------------------------------

८) वृक्षलागवड, वृक्षसंवर्धन, जलव्यवस्थापन, जलसंवर्धन या संबंधात प्रत्यक्ष केलेल्या कार्याची व जनजागृती / प्रसिध्दी व प्रेरणा याबाबत केलेल्या कार्याची तपशिलवार माहिती :- ---
----------------------------------------------------------------------------------------------

९) केलेल्या कार्याचा कालावधी, लागवड केलेल्या जीवंत झाडांची टक्केवारी सद्यस्थिती :- ---------
----------------------------------------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------------------------------------

| तपशील | २००६ | २००७ | २००८ | २००९ | २०१० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| लागवडीचे क्षेत्र ( हेक्टरमध्ये ) | | | | | | |
| लागवड केलेल्या झाडांची संख्या | | | | | | |
| जीवंत झाडांची संख्या | | | | | | |
| जलव्यवस्थापन/जलसंवर्धन | | | | | | |

१०) केलेल्या कार्याविषयी काही ' व्याख्याने/प्रकाशने/प्रसिध्दी ' झाली असल्यास त्याच्या सत्यप्रतीः- ----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

११) या अथवा अशा कामासाठी पुर्वी काही पारितोषिक, पुरस्कार, प्रशस्तीपत्र मिळाले असल्यास त्यांचा तपशील :-

----------------------------------------

१२) इतर माहिती असल्यास :- ----------------------------------------

**( अर्जदाराची स्वाक्षरी )**

**<u>प्रतिज्ञापत्र</u>**

प्रतिज्ञापूर्वक सही करतो की, वर नमुद केलेल्या सर्व बाबी माझ्या ज्ञान व माहितीनुसार सत्य आहेत आणि माझ्या स्पष्ट जाणीवेनुसार दिलेल्या आहेत. प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या माहितीचे मुळ दस्ताऐवज तसेच प्रत्यक्ष कार्यक्षेत्राची पाहणी करण्यासंबंधी निवड समितीने मागणी केल्यास त्वरीत उपलब्ध करून देण्याची हमी देतो.

ठिकाण :-

दिनांक :-

( अर्जदाराचे नांव, पत्ता व सही )

----------------------------------------

(केवळ कार्यालयाकरिता)

१) प्रस्ताव अग्रेषित करणा-या निवड समितीचा शेरा / शिफारस.